




दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३६१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.११ ऑगस्ट २०२५



**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**


## ‘मराठा मोर्चात दंगल घडविण्याचा कट’; मनोज जरांगे यांचा मुख्यमंत्र्यांवर गंभीर आरोप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, अहिल्यानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोव्यात ओबीसींचा मेळावा घेऊन २९ ऑगस्टला मुंबईत येणाऱ्या मराठा मोर्चात दंगल घडवण्याचा कट रचला आहे, असा गंभीर आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केला आहे. मुंबईतल्या मोर्चात काही गडबड झाली, तर त्याची जबाबदारी मुख्यमंत्री फडणवीस यांचीच राहील, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे. मराठा नेत्यांना संपविण्याचा फडणवीसांचा डाव आहे. राज्यातील ३० ते ३२ खासदार-आमदारांचा आपल्याला फोन आल्याचा दावाही जरांगे पाटील यांनी केला. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टला मुंबईत आंदोलन करण्यात येणार आहे. त्याच्या तयारी आणि आढावा बैठकीसाठी जरांगे रविवारी अहिल्यानगरला आले होते. त्यावेळी त्यांनी फडणवीसांवर गंभीर आरोप केला.



'सध्या राज्यात मराठा नेत्यांना संपवण्याचे काम सुरू आहे. यासाठी प्रत्येक मराठा मंत्र्यांसोबत देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पसंतीचा ओएसडी नेमला आहे. फडणवीस आतल्या गाठीचे आहेत. त्यांनी खासदार नारायण राणे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार अशोक चव्हाण यांच्यासारख्या नेत्यांवर डाव टाकला आहे. त्यामुळे सर्व मराठा मंत्री आणि नेत्यांनी सावध राहावे, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. याशिवाय प्रशासनातील मराठा अधिकाऱ्यांनाही त्रास दिला जात आहे. अशा मराठा अधिकाऱ्यांना अन्याय सहन करावा लागत असेल, तर त्यांच्या मागे मी खंबीरपणे उभा राहीन. फडणवीस कोणाचेही काम पटकन करत नाहीत. मग तो गोरगरीब असो, ओबीसी असो किंवा मराठा. आता ते ओबीसींसाठी लढणार असल्याचे सांगत आहेत, पण मग मराठ्यांसाठी कोण लढणार?, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

जेथे ओबीसी पालकमंत्री आहेत, तेथे भाजपचे मराठा कार्यकर्ते त्रास सहन करत आहेत. ज्यांना त्रास होतो, त्यांची नावे मी भविष्यात सांगणार आहे. मला आतापर्यंत ३० ते ३२ खासदार आमदारांचे फोन आले आहेत. मात्र, जेथे मराठा पालकमंत्री आहेत, तेथे ओबीसींना त्रास होतो का?, असा प्रश्नही मनोज जरांगे यांनी केला.

मनोज जरांगे यांनी आमदार संग्राम जगताप यांचीही भेट घेतली. याशिवाय विविध मराठा संघटना आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांचीही त्यांनी भेट घेत २९ ऑगस्टच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. हा मोर्चा अहिल्यानगरमार्गेच मुंबईला जाणार आहे. त्याचीही माहिती देण्यात आली.

## एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील रिक्त पदे त्वरीत भरावे : खा. प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील रिक्त पदांमुळे प्रशासकीय यंत्रणेवर मोठा ताण येत असल्याचा मुद्दा खा. प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत उपस्थित केला होता. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांनी दिलेल्या उत्तरातून या वस्तुस्थितीला दुजोरा मिळालेला आहे.



मंत्र्यांनी दिलेल्या माहितीतून, चंद्रपूर जिल्हा परिषदेत बाल विकास प्रकल्प अधिकारी (गट-ब),च्या १५ मंजूर पदांपैकी १४ पदे रिक्त आहेत. तसेच, अंगणवाडी पर्यवेक्षकांच्या ८९ मंजूर पदांपैकी ३० पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्या १५ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांमध्ये २ हजार ४४७ अंगणवाडी सेविकांच्या मंजूर पदांपैकी ६९ पदे आणि २ २ हजार ४४७ अंगणवाडी मदतनिसांच्या पदांपैकी १५४ पदे रिक्त आहेत. मंत्रालयानेच दिलेल्या माहितीनुसार या रिक्त पदांमुळे सेवांची गुणवत्ता आणि व्यापकता टिकवून ठेवण्यासाठी कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे.

या संदर्भात, महिला आणि बाल विकास मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, ‘मिशन सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.०’ ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. यामध्ये, केंद्र सरकार धोरण आणि नियोजनासाठी जबाबदार असले, तरी दैनंदिन कार्यक्रम अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनाची आहे. त्यामुळे विविध स्तरावरील रिक्त पदे भरण्याचे प्रकरण संबंधित राज्यांच्या अधिकार क्षेत्रात येते. या प्रश्नांवर केंद्र सरकार राज्य सरकारांसोबत नियमितपणे संवाद, व्हिडिओ कॉन्फरन्स आणि बैठकांद्वारे चर्चा करत असल्याचे सांगितले आहे.

## समता परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी सुभाष लोंढे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची राज्य कार्यकारणीची बैठक नुकतीच नाशिक येथे संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी राज्यातील विविध पदाधिकार्यांच्या निवडी जाहीर करुन त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यामध्ये अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अध्यक्षपदी सुभाष लोंढे यांची निवड करुन त्यांना नियुक्त पत्र छगनराव भुजबळ व समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते देण्यात आले. राज्यासह देशात अखिल भारतीय महात्मा



फुले समता परिषदेची ताकद अधिक वाढवण्यासाठी समता परिषदेच्या सर्व नवनियुक्त पदाधिकार्यांनी जोमाने काम करावे. राज्यातील सर्व ओबीसींचे संघटन करून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्राधान्य द्यावे, यासाठी ही निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, विधान परिषदेचे आमदार पंकज भुजबळ, ओबीसी महामंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ,प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर तसेच स्वीय सहाय्यक रविभाऊ सोनवणे उपस्थित होते. तसेच अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे, अहिल्यानगर महिला आघाडी जिल्हाध्यक्ष संगीता ढवळे, महानगराध्यक्ष ब्रिजेश ताठे, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, अहिल्यानगर उत्तर जिल्हा अध्यक्षपदी प्रशांत शिंदे, उत्तर जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश ताजणे याच्या निवडी जाहिर करण्यात आल्या यावेळी सर्व समता परिषद प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

या निवडीबद्दल जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे व इतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, प्रदेश संघटक रविभाऊ सोनवणे, प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, प्रदेश प्रचारक प्रा. संतोष विरकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार,पद्माकांत कुदळे, मुकुंद सोनटक्के, भगवान फुलसौंदर,अभय आगरकर, शरदभाऊ झोडगे,प्रा माणिकराव विधाते, किशोर डागवाले, बाळासाहेब बोराटे, संजय गारूडकर, रमेश गोरे, किसनराव रासकर,राजु शिंदे, सुवर्णा धाडगे, पत्रकार वसंत रांधवण, बबनराव घुमटकर, तालुका अध्यक्ष सोमनाथ खामकर, यांनी अभिनंदन केले.

## भाजपच्या खेळीने पुण्यात अजित पवारांची डोकेदुखी वाढली?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, पुणे :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका अगदी काही महिन्यांवर येऊन ठेपले आहेत. अशातच पुणे महानगरपालिकेसाठी करण्यात येणाऱ्या प्रभाग रचनेच काम प्रशासनाकडून अंतिम टप्प्यात आहे. पण आगामी महापालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचना करण्याचं काम प्रशासनाच्या नावाखाली सुरू असलं, तरी सूत्र मात्र भाजपच्या नेत्यांच्या हातात असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीने केला आहे. भाजपने आपल्या राजकीय सोयीसाठी प्रभागांची तोडफोड करून नकाशा तयार केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरत आहे.

भाजपसमोर या निवडणुकीत महाविकास आघाडी असली तरी खरा डोकेदुखीचा मुद्दा अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचं स्पष्ट दिसत आहे. माजी नगरसेवकांच्या ताकदीत पाहिलं तर पुण्यात भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकावर अजित पवार गटाची राष्ट्रवादी आहे. शिवसेना फुटल्यामुळे तिची ताकद पुण्यात आणखी कमी झाली आहे, तर काँग्रेसला गटबाजी आणि संघटनातील कमकुवतपणा नडतो आहे, दुसरीकडे मनसेचा प्रभाव २०१२ नंतर लक्षणीयरीत्या



कमी झाला आहे. अशा पार्श्वभूमीवर, भाजप समोर खरा आव्हान असणार आहे ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीच त्यामुळेच दादांच्या मजबूत गोटावर हल्ला चढवण्याचा भाजपचा डाव सुरू असल्याची चर्चा आता दबक्या आवाजात सुरु झाली आहे.

भाजप पुणे महापालिकेसाठी यावेळी कोणत्याही पक्षाशी युती करण्याच्या मनःस्थितीत नाही. स्वबळावर निवडणूक लढताना त्यांच्यासमोर सर्वात मोठं आव्हान राष्ट्रवादीचे असेल, हे भाजपला पूर्णपणे ठाऊक आहे. त्यामुळे प्रभाग रचनेतच राष्ट्रवादीची कत्तल करण्याची रणनीती आखण्यात आली असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. विशेषतः अजित पवारांचा प्रभाव असलेल्या वडगावशेरी, हडपसर आणि खडकवासला विधानसभा क्षेत्रातील शहरी भागात मोठे-मोठे प्रभाग करून राष्ट्रवादीचे नगरसेवक कमी करण्याचा डाव खेळला जात असल्याचा आरोप होत आहे.

यावरून सत्तेत सहभागी असणाऱ्या शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांचा रोष ओसंडून वाहतो आहे. प्रभाग रचनेच्या महत्त्वाच्या चर्चेतून भाजपने जाणीवपूर्वक त्यांना दूर ठेवले, असा आरोप स्थानिक नेत्यांकडून होत आहे. शिवसेनेने सर्वप्रथम संताप व्यक्त करत थेट मुंबईत मोर्चा वळवला, आणि ही बाब उपमुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री असणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली. त्यानंतर राष्ट्रवादीनेही उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे धाव घेतली.

आता प्रभाग रचना एकनाथ शिंदे मंत्री असणाऱ्या नगरविकास खात्याकडे गेल्याने राज्य पातळीवर मोठा राजकीय सामना रंगण्याची चिन्हं दिसत आहेत. स्थानिक पातळीवर एकत्र येण्यात अपयशी ठरलेले महाविकास आघाडीचे नेते, आता मुंबईत ‘सिनियर लेव्हल’वर मोठा खेळ खेळण्याच्या तयारीत आहेत. पुण्यात मात्र, भाजपने अजित पवारांना गाठण्यासाठी आखलेला ‘फुलप्रूफ प्लान’ राजकीय वर्तुळात चांगलाच चर्चेचा विषय ठरत आहे.

## नागपूर-पुणे वंदे भारतचे लोकार्पण, विदर्भ-पश्चिम महाराष्ट्राचा प्रवास सुस्साट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण केले आहे. या सोहळ्याला नागपूर रेल्वे स्थानकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

नागपूर-पुणे दरम्यान सेमी हायस्पीड वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याची मागणी प्रवाशांकडून गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. अखेर ही प्रतीक्षा रविवारी संपुष्टात आली. पंतप्रधान मोदी यांनी बेंगळुरू येथून लोकार्पण केले, तर नागपूर स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ८ वरून केंद्रीय मंत्री गडकरी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ट्रेनची प्रत्यक्ष सुटका करण्यात आली.

ट्रेन रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोचमध्ये जाऊन प्रवासी व शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी ही सेवा विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र दरम्यानच्या प्रवासासाठी वेगवान, आरामदायक आणि अत्याधुनिक सोय असल्याचे सांगितले. दररोज शेकडो प्रवासी नागपूर-पुणे प्रवास करतात. वंदे भारत सुरू झाल्याने त्यांना वेळेची बचत होऊन, अधिक सोयीस्कर प्रवासाचा लाभ मिळेल. ही सेवा व्यापार, शिक्षण आणि पर्यटनाला नवी चालना देईल, असेही त्यांनी



नमूद केले.

**१२ तासांचा प्रवास, आठवड्यात ६ दिवस सेवा...**

नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस सुमारे ८८१ किमी अंतर अवघ्या १२ तासांत पूर्ण करेल. ही सेवा आठवड्यात सहा दिवस चालणार आहे. ट्रेनमध्ये ८ कोच असून, त्यापैकी ७ एसी चेअर कार आणि १ एक्झिक्युटिव्ह चेअर कार आहे. एकूण ५९० प्रवाशांची आसनक्षमता आहे. अजनी ते पुणे दरम्यान ही गाडी वर्धा, अकोला, भुसावळ, जळगाव, अहमदनगरसह १० प्रमुख स्थानकांवर थांबेल. पुणे येथून सकाळी ६.२५ वाजता सुटून सायंकाळी ६.२५ वाजता अजनी येथे पोहोचेल. अजनी येथून सकाळी ९.५० वाजता सुटून रात्री ९.५० वाजता पुणे येथे पोहोचेल.

**स्लीपर कोचची मागणी..**

जरी ही सेवा पूर्णपणे चेअर कार स्वरूपात असली तरी काही प्रवाशांनी लांब पल्ल्याच्या या प्रवासासाठी स्लीपर कोच जोडण्याची मागणी केली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या मागणीकडे लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**कनेक्टिव्हिटी व विकासाला चालना...**

या ट्रेनच्या सुरूवातीमुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होईल. विशेषतः व्यापारी, विद्यार्थी आणि पर्यटकांना याचा मोठा फायदा होणार आहे. वेळेची बचत, प्रवासातील आराम आणि आधुनिक सुविधा या सेवेमुळे प्रवाशांच्या अनुभवात भर पडणार आहे. रेल्वेच्या वंदे भारत मालिकेतील ही नवी गाडी महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेग वाढवणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नागपूर-पुणेदरम्यान धावणारी सर्वात जलदगती गाडी आहे. गाडी क्रमांक २६१०१ पुण्यातून सकाळी ६.२५ वाजता सुटणार आहे. गाडी क्रमांक २६१०२ अजनीतून सकाळी ९.५० वाजता सुटणार. या वंदे भारतला एकूण ६ डब्बे आहेत. या रेल्वेची एकूण ५९० प्रवासी क्षमता आहे. या रेल्वेमुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. नागपूर-पुणे वंदे भारत देशातील सर्वांत लांब पल्ल्याची गाडी. ही रेल्वे एकूण ८८१ किमी अंतर धावणार. या रेल्वेचा वर्धा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, पुनतांबा, दौंड येथे थांबा असणार आहे.




## पाणीप्रश्न... तीन दशकांचा!

मराठवाड्याचे मुख्यालय असलेल्या, पंधरा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या छत्रपती संभाजीनगरचा पाणीप्रश्न वर्षागणिक गंभीर होत आहे. सध्या येथे आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो; परंतु त्यामुळे येथील जनता संतप्त नाही. ती शांत आहे. कदाचित संतांची भूमी असल्यामुळे हे झाले असावे. उद्योग, शिक्षण आणि पर्यटन यांचे केंद्र असलेल्या या शहरात पाणीपुरवठ्याची ही स्थिती पाहून बाहेरच्या व्यक्तींना आश्चर्य वाटते. असे कसे तुम्ही राहू शकता, असे प्रश्नही विचारले जातात. शहरापासून ५० किलोमीटरवर असलेल्या जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा होतो. मात्र, नियोजनाचा अभाव, नवीन पायाभूत सुविधांची कमतरता आणि राजकारण यांमुळे शहराच्या पाणीप्रश्नाचे तीनतेरा वाजले आहेत. गेल्या तीन दशकांत ही परिस्थिती क्रमश: बिघडत गेली आहे.

पाणीप्रश्न गंभीर होण्यामागचे कारण स्थानिक नेतृत्वाची प्रशासनावर कमी असलेली पकड हेच आहे. शहरासाठी दोन पाणी पुरवठा योजना सध्या कार्यरत आहेत. पहिली ७०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी १९७५मध्ये कार्यान्वित झाली. दुसरी १२०० मिलिमीटरची योजना १९९१मध्ये सुरू झाली. या दोन्हीही योजना कालबाह्य झाल्या आहेत. २००६मध्ये समांतर जलवाहिनीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. योजना मंजूर झाली तेव्हा सुमारे ३६० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. केंद्र आणि राज्य सरकारने त्यासाठी पुढाकार घेतला. सरकारच्या मंजुरीनंतर महापालिकेने परस्पर स्वरूप बदलून सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) केले आणि त्यातच ही योजना फसली. २०१६मध्ये ती गुंडाळली गेली तेव्हा किंमत ७९२ कोटी रुपयांवर गेली होती. दरम्यान, नागरिकांचे हाल सुरू झाले. पाणीपुरवठा एक दिवसाआड, दोन दिवसांआड असे करीत आता आठवड्यातून एकदा होतो आहे.

सहा वर्षांपूर्वी शहरासाठी पाणीपुरवठा योजनेची नव्याने आखणी करण्यात आली. खर्चाचा आकडा १६८० कोटी रुपयांवर पोहोचला. त्यात केंद्र, राज्य सरकार व महापालिकेचा हिस्सा होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हे काम 'जीव्हीपीआर' कंपनीला दिले. योजनेचा कार्यादेश ४ फेब्रुवारी २०२१ रोजी झाला. काम पूर्ण करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी देण्यात आला. काम सुरू होऊन आता साडेचार वर्षे झाली; परंतु ते अद्याप संपलेले नाही. योजनेच्या कामाबद्दल शासन, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेने वारंवार नाराजी व्यक्त करीत ताशेरे ओढले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून न्यायव्यवस्था योजनेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करीत आहे. दरम्यानच्या काळात या योजनेचा खर्च २७४० कोटी रुपयांवर गेला आहे.

ही योजना पूर्ण झाल्यावर शहराला ३९२ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी मिळेल, असा दावा आहे. गेल्या दोन उन्हाळ्यांपासून पाण्याची ओरड झाली की सत्ताधारी, विरोधक आढावा घेतात. ठरावीक उत्तरे दिली जातात आणि पुढे काहीच होत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी योजनेच्या कामाचा आढावा घेऊन ऑक्टोबरपर्यंत पहिला टप्पा पूर्ण करण्याचा दोनशे एमएलडी पाणी उपलब्ध करून देण्याचा आदेश दिला. तो पाळला जातो की नेहमीप्रमाणे तांत्रिक कारणे दाखविली जातात, हे पाहावे लागेल. शहराशी संबंधित असलेल्या नेतेमंडळींनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या वेळी आढावा बैठकांचा सपाटा लावला होता. आपल्याल्या असलेली काळजी दाखवण्याचा प्रयत्न केला. आता पालिका निवडणुकीच्या वेळीही असेच पाणीनाट्य होईल; पण पाणीप्रश्न सुटण्याची खात्री नाही.

जुन्या योजनांमध्ये जलवाहिनी फुटणे, पंपहाउस आणि जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात तांत्रिक अडचणी निर्माण होणे आदींची मालिका नेहमीप्रमाणे सुरूच आहे. 'जायकवाडी' भरूनही पावसाळ्यात नागरिकांना पाणी दहा ते बारा दिवसांनी मिळत आहे. नागरिक त्रस्त आहेत. पालिकेची यंत्रणा मात्र निर्ढावल्यासारखी आहे. शहराचा गाडा हाकणारे नामानिराळे आहेत. नवीन योजनेचे काम केव्हा पूर्ण होणार? शहराला पाणी केव्हा मिळणार? 'धरण उशाला, कोरड घशाला' हे चित्र केव्हा पुसले जाणार? असे अनेक प्रश्न सध्यातरी अनुत्तरित आहेत.

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट



नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नायक दिवा शहराचा शैलेश दादा, लाडक्या बहिणींचा लाडका दादा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दिवा (ठाणे) :** एका सामान्य कुटुंबातील मुलगा अचानक सामाजिक क्षेत्राचा भाग होऊन उत्तुंग गरुड भरारी घेतो. आणि बघता बघता आकाशाला ही गवसणी घालतो आहे असे सर्वांचे कैवारी आणि दिवा विकास प्रतिष्ठाण संस्थापक आणि ज्यांनी सलग दोन वेळा प्रचंड मताधिक्याने ठाणे महानगर पालिकेत आपले नगरसेवक पदाचे नाव कोरले ते शैलेश मनोहर पाटील अर्थात् जनसामान्यांचे दादा श्रीमंती ही पैशाची असता कामा नये. ती मनाची आणि विचारांची असावी. हे ध्येय घेऊन जनकल्याणाचा मार्ग शोधणारा असंख्य कार्यकर्त्यांचा सेनापती. सैन्य हे पोटावर चालते, तरच ते युद्ध जिंकू शकतात. तसाच कार्यकर्ते जर पोटाने तृप्त असेल तरच तो समाधानी दिसून, खांद्याला खांदा लावून



लढेल. या विचाराने प्रेरीत झालेले शैलेश पाटील यांनी असंख्य कार्यकत्यांना नोकरी, व्यवसाय देऊन सक्षम बलवान बनविले. म्हणून त्यांचा उल्लेख कार्यकर्त्यांचा सेनापती केला तर कुठे ते वावगे ठरणार नाही. अठरा पगड जातींच्या दिवा शहरांतील असंख्य लोकांना संघटीत करून, दादाने कार्यकर्त्यांची एक बलाढ्य पलटण बनवली. त्यांच्या अडीअडचणीत धावत जाऊन त्यांना गोंजारले. दिवा शहरात एकमेव संकटात धाऊन येणारा नेता म्हणजे शैलेश दादा. जेव्हा सर्व उपाय संपतात तेव्हा, शैलेश दादांचा दरवाजा सर्वांसाठी आधार होऊन, उभा असतो. भुकेल्याला अन्न दे, वस्त्रहीन माणसाला कपडे दे, विद्यार्थ्यांना पुस्तके वह्या दे, फी दे, प्रवेश फी दे, कोणाला रिक्षा दे, हाताला काम दे, पोटाला अन्न दे, हा परोपकार दादांचा. त्याचा कुठे ही कधी ही उल्लेख ही नाही, आणि गर्व ही नाही. जनता हीच माझी संपत्ती हा ज्याने विचार केला तो एकच येथिल भूमिपुत्र शैलेश पाटील हे सण, उत्सव, महापुरुषांच्या जयंती, देवळे, बुद्ध विहारे यासाठी सढळ हस्ते दान पारमिता निभावणारा, दानशूर कर्ण.

महापालिका, शासन यांचा निधी उपलब्ध होत नाही. म्हणून हताश न होता, स्वतः च्या पैशाने रस्ते, पायवाटा, इमारतींची रंगरंगोटी करून देणारा, एक मसिहा. सामान्य लोकांचा शहेनशाह. पाण्याचे बिल असो, लाईटचे थकीत बिल असो, लाईन कापली, विज कनेक्शन तोडले, दादा अधिकारी यांना कॉल करून दम देत नाही. सरकारी नुकसान करीत नाही, कमी करा म्हणून सांगत नाही, फक्त आकडा सांग, हातात पैसे देतो, आणि पुन्हा असा गुन्हा करूं नका, ही ताकीद देतो आहेत का बोलण्या सारखे, टीका करण्या सारखे काही शब्द? स्वच्छ मनाचा, जे पोटात तेच ओठाने बोलणारा दादा. मनात कपट न ठेवता, दुश्मनाला ही घास भरविणारा अवलिया ! म्हणून दिव्यातील सर्व लाडक्या बहिणींचा तो लाडका दादा आहे.

## सरळ..

आडवे पडे वाकडे
करावे त्यांना सरळ
साप पण चक्रावेलं
अशीओकतो गरळ

जमतीभोवती सारे
पाहून गार हिरवळ
भुंगे घाली गुंजारव
पसरे सुगंध दरवळ

प्रभावपडेल शत्रूचा
केवढी पडते भुरळ
सहज सापडे गर्तेत
सुटणे शक्य विरळ

शोधतबसे जगतात
असूनआपलेजवळ
अस्वस्थ मनस्थिती
गोड लागेना कवळ

विश्वासार्ह जवळची
राहे थोडीशी केवळ
पंगतीसुखात सरती
उरते मागे उष्टावळ

क्लुप्ती युक्ती करती
सत्ते करता उतावळ
जन सेवा करण्याची
खरी कुणा कळवळ

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## मंद्रूपच्या तायक्वांदो अकॅडमीत रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, सोलापूर :** बहीण भावाच्या अतूट नात्याची व प्रेमाची जपणूक करणारा सण म्हणजे रक्षाबंधन. देशभरात सर्वत्र मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो. बहिण भावाचा हा आनंद व आपुलकीचा सण मंद्रूप येथील दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी मोठ्या उत्साहात साजरा केला.

यावेळी मुलींनी स्वतः आपल्या हाताने फुले, लोकर, रेशमी धागे, कापूस, रंगीत तांदूळ, मनी



अशा गृहपयोगी वस्तूंचा वापर करून बनवलेले राख्या आणल्या होत्या.

आपल्या अकॅडमी मधील भावांसाठी अतिशय सुंदर मनमोहक अशा राख्या आपल्या भावाचे लाडूने तोंड गोड करुन मनगटावर बांधल्या. तेव्हा या भावांनी ही आपल्या बहिणींसाठी चॉकलेट्स, पेन्सिल, पेन, वही अशा वेगवेगळ्या भेट वस्तू देऊन भावाचे कर्तव्य बजावण्याची परंपरा जोपासली. या उपक्रमामुळे मुलींच्या चहे-यावर एक वेगळाच आनंद दिसत होता. हा उपक्रम राबविण्यासाठी दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमी मंद्रूप मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे, राष्ट्रीय खेळाडू सुमित पवार, मयुरेश भागवत यांनी परिश्रम घेतले.

## 'ॐ नम: शिवाय' कपड्यांवर नको !

श्रावण मास सुरु असल्याने सर्वत्रचे वातावरण भक्तिमय झाले आहे. श्रावण मासात शिवभक्त भगवान शिवाची विशेष भक्ती करतात. काही जण प्रत्येक सोमवार निर्जली उपवास करतात तर काही जण श्रावण मास पादत्राणे परिधान करत नाहीत, या मासातील प्रत्येक सोमवारी शिवमंदिरात शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. याच दिवसांत ॐ नम: शिवाय। हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम: शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नम: शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नम: शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नम: शिवाय श्र सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिववभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आज श्री ढोकेश्वराची भरणार सर्वात मोठी यात्रा

### टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांतर्फे विशाल भंडाऱ्याचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ईशान्येस ३ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या प्राचीन व पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वरची उद्या तिसऱ्या श्रावणी सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी यात्रा भरणार आहे. पंचक्रोशीतील श्रावण महिन्यात ढोकी येथिल ढोकेश्वर मंदिर परिसरातील सर्वात मोठी यात्रा भरते. यात्रेमध्ये विविध खेळणी, पाळणाघरे, खाऊची दुकाने संसारोपयोगी वस्तूंची दुकाने दाखल झाले आहेत.

टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही तिसऱ्या श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त श्री ढोकेश्वर मंदिर येथे भव्य विशाल भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विशाल भंडाऱ्याचे हे या वर्षी १७ वे वर्ष पूर्ण होत आहेत. यावर्षी समाधानकारक पाऊसमान असल्याने दर्शनासाठी व यात्रेसाठी येणाऱ्या हजारो भाविकांची गर्दी होईल,असा अंदाज आहे. महाराष्ट्र राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातून ढोकेश्वरला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. यात्रेनिमित्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून २१ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे व पिण्याच्या पाण्याची सोय टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी चांगल्याप्रकारे नियोजन केले आहे. पंचक्रोशीतील दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी सोमवारी सकाळी ७ वाजेपासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वर्दीतील दर्दी माणूस मदतीसाठी धावला

### आगीत सर्वस्व गमावलेल्या आदिवासी कुटुंबांना दिलासा देणारा पोलीस हात



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथील अकरावड वस्तीवरील तीन आदिवासी कुटुंबांचे संसार काही दिवसांपूर्वीच्या मध्यरात्री भीषण आगीत भस्मसात झाले. रात्री सुमारास लागलेल्या या आगीत गोविंद चंद्रभान माळी, भाऊसाहेब विश्वनाथ वाघ आणि दगुबाई श्रीहरी माळी या कुटुंबांचे लाखो रुपयांचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. यात त्यांचे घरटे, वस्तू, ओळखी आणि भविष्य क्षणार्धात उध्वस्त झाले. या धक्कादायक घटनेनंतर मदतीचा कुणीतरी हात पुढे येईल का, या आशेने व्याकुळ असलेल्या कुटुंबांना लासलगाव पोलीस ठाण्यातील वर्दीतले संवेदनशील अधिकारी उपनिरीक्षक किरण साळुंखे, पोलीस कॉन्स्टेबल सागर आरोटे आणि चंदू मांजरे यांनी मायेचा हात दिला. सपोनि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, या अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत, आगीत होरपळलेल्या कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. त्यांना मानसिक धीर देत, या संकटसमयी आपण एकटे नाही, हा दिलासा दिला. या कार्यात पोलिस पाटील राहुल सोनवणे, एकलव्य संघटनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख रामेश्वर माळी, तसेच इतर समाजहितैषी मंडळींनीही साथ दिली. ही मदत माणुसकीची साक्ष देणारी आहे. त्यांच्यासाठी ही केवळ दिलासा देणारी मदत नव्हे, तर एक आशेचा किरण आहे. दु:खाच्या काळोखात माणुसकीचा एक दिवा उजळवणाऱ्या या पोलीस अधिकाऱ्यांचे कार्य समाजासाठी खरोखरच प्रेरणादायी ठरत आहे.

## कोपर ब्रिजवर प्रचंड वाहतूक कोंडी; पावसातही वाहतूक पोलीस तातडीने रस्त्यावर



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१०, डोंबिवली (ठाणे) :** कोपर ब्रिज परिसरात दिनांक १० ऑगस्ट २०२५ च्या सकाळपासूनच प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मुसळधार पावसामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली होती. मात्र, वाहतूक कोंडी तातडीने सोडवण्यासाठी डोंबिवली वाहतूक शाखेचे अंमलदार वेळ न दवडता थेट रस्त्यावर उतरले. पावसात रेनकोट घालण्याचाही अवकाश न घेता, कर्मचारी आपल्या कर्तव्य बजावण्यात गुंतले होते. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन वाहनांची रांग फोडत, हातवारे करत आणि स्वतः पाण्यात भिजत वाहतूक सुरळीत करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. स्थानिक नागरिकांनी या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले असून अशा वेळी हेच खरे खाकीतील हिरो आहेत, अशी प्रतिक्रिया दिली.

## भोकरात भाजप आमदार केराम यांची दबंगिरी

### डिफेंडरने दुचाकीला धडक, पीडितास धमकी देत घटना स्थळावरून फरार



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१०, किनवट (नांदेड) :** किनवटकडे येत असताना भोकर येथे किनवट-माहूर विधानसभा क्षेत्राचे भारतीय जनता पक्षाचे आमदार भीमराव केराम यांच्या डिफेंडर गाडीने एक दुचाकीला जोरदार धडक दिल्याची धक्कादायक घटना घडली. दुचाकीवर राशनसह एक लहान मुलगी घेऊन जात असताना ही धडक बसल्याचे नागरिकांनी सांगितले. अपघातानंतर मदत करण्याऐवजी आमदार केराम यांनी पीडितास तुझ्याने जे होईल ते कर अशी उघड धमकी दिली आणि घटनास्थळावरुन पळ काढल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेनंतर जनतेत प्रचंड संताप असून आमदारांना पैशाचा आणि पदाचा माज आल्यामुळे सामान्य जनतेचे जीव धोक्यात येत आहेत अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. स्थानिक नागरिकांनी तात्काळ या घटनेची चौकशी करून पीडित कुटुंबाला न्याय देण्याची मागणी केली आहे.

## ...तर अख्ख्या महाराष्ट्रातील भाऊबंदकी नष्ट होईल - डॉ.सबनीस

### डॉ.बाळासाहेब बांडे यांच्यावरील संघर्षयात्री ग्रंथाचे प्रकाशन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्रात अनादी काळापासून भाऊबंदकी सुरू आहे. ती शिवाजी महाराजांच्या काळात अन पेशवाईमध्येही सुरुच होती. पण आज एका चुलत भावाने आपल्या भावावर इतके छान पुस्तक लिहीले आहे. ही साधी गोष्ट नाही. प्रत्येक कुटुंबात असे भाऊ जन्माला आले तर महाराष्ट्रातील अखखी भाऊबंदकी नष्ट होईल, असा विश्वास अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ लेखक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केला.

नोबेल पुणे हॉस्पिटलचे मुख्य कन्स्टलंट व आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे यांच्या जीवनावर स्व.बाबासाहेब बांडे यांनी लिहीलेल्या 'संघर्षयात्री डॉ.बाळासाहेब बांडे' या ग्रंथाच्या पहिल्याभागाचे प्रकाशन आज ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे, ह.भ.प डॉ. नारायण महाराज जाधव, डॉ.श्रीपाल सबनीस, पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते व जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी, खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, साहित्यविश्व प्रकाशनचे संस्थापक विक्रम शिंदे, मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे आदी उपस्थित होते.यावेळी खासदार लंके, आमदार दाते, विजय औटी, डॉ. जाधव महाराज, सिताराम खिलारी, जी.डी. रोहोकले, सविता बांडे, डॉ.बाळासाहेब बांडे यांनी ही मनोगत व्यक्त केली.

प्रास्तविक बापूसाहेब बांडे तर सूत्रसंचालन प्रा. विजय लोंढे यांनी केले. रामदास पुजारी यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ.सरोज बांडे, दत्तात्रय बांडे, सविता बांडे, मंदा हांडे, सखाराम औटी, रावसाहेब रोहोकले, गिताराम म्हस्के, डॉ. अक्षयदीप झावरे, रावसाहेब झावरे, बाळासाहेब खिलारी, महेश ढूस, डॉ. भाऊसाहेब खिलारी आदी मान्यवर उपस्थित होते.

**..तर लाचार पिढया तयार होतील**

डॉ.सबनीस पुढे म्हणाले, डॉ.बांडे यांनी जो संघर्ष अनुभवला व भोगला तो त्यांच्या एकट्याचा नाही. कारण भांडवली व्यवस्थेत तुमचे केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक अन सांस्कृतिक व शैक्षणिक शोषणही होत असते. म्हणून हा संघर्ष प्रातिनिधीक वाटतो. व या विषमतेतूनच डॉ.बांडे यांच्यासारखे संघर्षशील व्यक्तिमत्व घडत असते. शिक्षक बिघडला तर विद्यार्थी पण बिघडत असतो. पुढाऱ्यांच्या बॅगा उचलणारे शिक्षक असतील तर लाचार पिढीच तयार होत असते.

**प्रेरणा कृतीतून दिसली पाहिजे**

अण्णा हजारे म्हणाले, जो संघर्ष करतो तोच चांगला मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरू शकतो. तुमची प्रेरणा ही कृतीतून दिसत असते, बोलण्यातून नव्हे. डॉ. बांडे यांच्या आरोग्य व सामाजिक कामाची कृती खूप उंचीची आहे म्हणून त्यांचे काम आज समाजाला प्रेरणादायी ठरत आहे. केवळ पारनेरचाच नव्हे तर कुठलाही रूग्ण त्यांच्याकडे गेल्यास त्याला मार्गदर्शन व उपचार चांगले भेटणार हा रुग्णाला व त्यांच्या नातेवाईकांना विश्वास असतो हे डॉ. बांडे यांचे खरे यशाचे गमक आहे.

**पद्मश्री मिरवण्यासाठी नाही**

पद्मश्री ही जनतेसाठी आहे. ती मिरवण्यासाठी नाही. जिल्ह्यात मी प्रोटोकॉल कधीच पाळला नाही. लोकांसाठी काम करत राहिलो. डॉ. बांडेही रुग्ण कुठला हे ते बघत नाही. आरोग्य क्षेत्रात त्यांचे मोठे काम आहे. गावातही सामाजिक काम केले पाहिजे त्यातून आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचा जन्म झाला. संघर्षयात्री प्रवास महत्त्वाचा आहे. पुस्तक प्रेरणा देत असतात. हातात आलेला मोबाईल आज घातक ठरत असून कुटुंब उध्वस्त होत आहेत. गुटखा खाणारी पिढी निर्माण होत आहे. पर्यावरण संवर्धन झाले नाही तर पुढच्या २५ वर्षात मानवी अस्तित्व धोक्यात येणार आहे, अशी भिती पोपटराव पवार यांनी व्यक्त केली.

## धडक मोर्चा आरक्षणाचा, लढा गरजवंताचा या अनुषंगाने बैठक संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईवर धडक मोर्चा लढा आरक्षणाचा, लढा गरजवंतांचा या अनुषंगाने तालुक्यातील लढ्यात सहभागी होण्यासाठी लोकसंख्या वाढवणे व लोकजागृती करणे आणि नियोजन यांसाठी आज मुदखेड येथे शासकीय विश्रामगृहात रविवार, १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मराठा सेवक शाम पाटील वडजे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. प्रथमतः मुदखेड शहरातील मराठा सेवक कै.अमोल आबादार यांचे दुःखद निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमास सुरुवात झाली. मनोज जरांगे पाटील दिनांक २७ ऑगस्ट २०२५ सराटी अंतरवाली येथून दिनांक २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुंबई येथे लाखो मराठ्यांसह पोहोचणार आहेत. या लढ्यात सहभागी होण्यासाठी मुदखेड तालुक्यात बारड व मुगट सर्कल निहाय मराठा सेवक गावोगावी जाऊन जनजागृती करणार आहेत. यासाठी तालुक्यांतील प्रत्येक गावातील प्रत्येक व्यक्ती मुंबई येथे कसा पोहोचेल यासाठी प्रयत्न करतील आणि स्वतः स्वतः च्या हक्कासाठी लेकरा, मुलाबाळांच्या भवितव्यासाठी, आरक्षण मिळण्यासाठी सरकारने दिलेला शब्द पाळण्यास भाग पाडण्यासाठी मुंबईला निघतील असा ठराव सर्वानुमते उपस्थित सकल मराठा समाजाच्या वतीने घेण्यात आला. यावेळी तालुक्यातील गाव, वाडी, वस्तीतील शेकडो मराठा बांधव उपस्थित बांधवाने 'मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' 'आरक्षण आमच्या हक्काच' अशा घोषणांनी बैठकीचा समारोप झाला.

## दिवा चौकाचे मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण; शिवभक्तांचा जल्लोष




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, दिवा (ठाणे) :** दिव्याच्या मध्यवर्ती भागातील दिवा चौकाचे नाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने असावे. अशी गेली कित्येक वर्षे असंख्य शिवप्रेमींची इच्छा होती. पण यावर प्रशासकीय आणि राजकीय स्तरावरून नेहमीच उदासीन भूमिका घेतली गेली. दिवा चौकाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज या नावाने असावे. यासाठी शिवभक्त प्रकाश दत्ता पाटील यांनी पुढाकार घेत रविवार, दिनांक १० ऑगस्ट रोजी या चौकाचे नामांतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने करण्याचे जाहीर केले होते. यासाठी त्यांनी दिव्यातील सर्व नागरिकांना, शिवजयंती उत्सव मंडळे, विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांना या नामांतर सोहळ्यात एक सर्व राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून एक शिवभक्त म्हणून सामील होण्याचे आवाहन केले होते.

त्यानुसार सकाळी शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात दिवा चौकात गर्दी केली होती. यावेळी विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी या सोहळ्याला हजेरी लावली यात मनसेचे तुषार पाटील, शिवसेना उबाठाच्या ज्योती पाटील, भाजपचे सचिन भोईर, आर.पी.आय चे दिनेश पाटील, सौरभ अंढागळे, दिवा व्यापारी संघटनेचे चेतन पाटील विविध सामाजिक संघटनांचे बालाजी कदम,प्रकाश पाटील, राहुल खैरे, शैलेश पवार उपस्थित होते. शिवरायांच्या वेशभूषेतील रमेश शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. शिवरायांच्या नावाने करण्यात आलेल्या चौकाच्या नामकरणाने दिवेकर नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## पारनेर दूध संघावर - विखे समर्थक जनसेवा पॅनलचा दणदणीत विजय



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका दूध संघाची निवडणूक जाहीर झाल्यापासुन पारनेरच्या राजकारणात काही बदल होण्याची खलबते चालू होती. परंतु पारनेर तालुका दूध संघाचे मतदान मोजके असल्याने पारनेर तालुक्याचा विकास समोर ठेवून सर्व मतदारांनी खऱ्या लोकशाहीला मतदान केल्याचे चित्र आज दुध संघाच्या निवडणुकीत आज पाहायला मिळाले. पारनेर तालुका दुध संघात एकुन मतदान ८१ होते. घडलेले मतदान हे ६६ झाले, दुध संघाच्या निवडनुकित विखे समर्थकांचा जनसेवा पॅनलसाठी राहुल शिंदे पाटील, तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी विशेष परीश्रम घेऊन पारनेर तालुका दुध संघावर परत आपली पकड कायम ठेवली.

पारनेर तालुका दुध संघावर नव निर्वाचित संचालक म्हणून सविता औटी, उत्तम भालेकर, कल्याण काळे, मारुती मुंगशे, दत्ता पवार, संदीप ठुबे, दादाभाउ वारे, किसन गवळी, भिमा शिंदे, युवराज पठारे, राजेंद्र पाचारणे असे संचालक म्हणून भरघोस मतांनी निवडुन आले. त्यांचे पारनेर तालुक्याच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.पारनेर तालुका दूध संघाचे किंगमेकर राहुल दादा शिंदे (पाटील) यांनी विरोधकांना चांगला धक्का दिला असून आगामी जिल्हा परिषद निवडनुकिसाठी नव संजीवनीच समर्थकांना दिली आहे.

# लाडक्या बहिणींच्या पाठिशी सदैव खंबीरपणे उभा राहणार : आ.मुनगंटीवार

## रक्षाबंधनाचा पवित्र धागा म्हणजे प्रेम, विश्वास व नात्यांचे बळ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** बल्लारपूर मतदारसंघातील माझ्या लाडक्या बहिणींच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर मी पूर्ण शक्तीने पाठीशी उभा राहीन. त्यांच्या प्रगतीसाठी काम करताना कोणतीही कसर सोडणार नाही, असा ठाम निर्धार राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी रक्षाबंधन सोहळ्यात व्यक्त केला. राम लीला सभागृह, मुल येथे भाजपा मुल तालुक्याच्या वतीने आयोजित रक्षाबंधन सोहळ्यात उपस्थित माजी जिल्हा परिषद अध्यक्षा संध्याताई गुरनुले, प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, भाजपा तालुका अध्यक्ष चंदू मारगोनवार, भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण मोहूर्ले, रत्नमाला भोयर, उषाताई शेंडे, किरण कापगते, भारती लाकडे, वर्षा परचाके, वंदना आगरकाटे, प्रभाकर भोयर, नंदू रणदिवे, मोतीलाल टहलीयानी, अविनाश जगताप, अजय गोगूलवार, चंद्रकांत आष्टनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. मुनगंटीवार म्हणाले, रक्षाबंधनाचा पवित्र धागा हा नात्यांना अतूट बळ देणारा आणि प्रेम, विश्वास व नात्यांच्या अद्वितीय बंधाचा प्रतिक आहे. या पवित्र नात्याला जोपासण्यासाठी व बहिणींना योजनांचा लाभ थेट गावात मिळावा, यासाठी फिरते जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे.



बल्लारपूर विधानसभेत मुली व महिलांसाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे उपकेंद्र, स्व. सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र स्थापन करून शिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध केल्या आहेत. चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लबमध्ये विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक आरक्षणाची सुविधा, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचा लाभ तसेच आरोग्य शिबिरांद्वारे महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी मोठ्या संख्येने बहिणींनी राखी बांधून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रती आपुलकीचा मान व्यक्त केला. रक्षाबंधनाच्या निमित्ताने शूरवी महाविद्यालय, मुल येथे राखी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी कुशल हस्तकौशल्यातून साकारलेल्या सुंदर राख्या स्नेहाने बांधत रक्षाबंधनाच्या नात्याला अलौकिक असा गौरव बहाल केला असल्याचे यावेळी आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# जे.एन.पी. विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संघर्ष

**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.१०, उरण (रायगड) :** जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटी (गछझअ) विद्यालयातील (शेवा) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी गेल्या ७ वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक आणि मानसिक छळाविरोधात तीव्र आंदोलन करणार आहेत, आपल्या विविध मागण्यांसाठी त्यांनी दिनांक ११ ऑगस्ट २०२५ पासून शाळेच्या प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. रुस्तोमजी केरावाला फाऊंडेशन (विग्बोर) या संस्थेच्या दुर्लक्षित धोरणांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.



## ११ ऑगस्टपासून आमरण उपोषण

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुस्तोमजी केरावाला फाऊंडेशनने गेल्या ७ वर्षांपासून त्यांच्या हक्कांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले आहे. यामध्ये जुलै २०१९ पासून थकीत असलेला सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारा महागाई भत्ता आणि वार्षिक वेतनवाढ यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याला गंभीर आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तसेच संस्थेने अजूनही सातवा वेतन आयोग लागू केलेला नाही. ज्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

प्रशासनाकडे वारंवार मागणी करून ही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. शासनाच्या २३ नोव्हेंबर २०२२ च्या निर्णयानुसार शाळेचे हस्तांतरण होऊन ३ वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी विविध शासकीय कार्यालयांना अनेक पत्रे पाठवली, पण त्यांची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे गेल्या ६ वर्षांपासून त्यांचा पाठपुरावा व्यर्थ ठरला असून सर्व प्रश्न प्रलंबित आहेत. यावेळी कर्मचाऱ्यांनी आता कठोर भूमिका घेतली असून जोपर्यंत ७ वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत हे आमरण उपोषण सुरूच राहील असा त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, जर ११ ऑगस्टपूर्वी त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत आणि उपोषणादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन अनेक महत्त्वाच्या व्यक्ती आणि संघटनांना पाठवले आहे. यामध्ये आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मनोहरशेठ भोईर, कोकण शिक्षक मतदारसंघातील आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, कोकण पदवीधर मतदारसंघातील आमदार निरंजन डावखरे यांचा समावेश आहे. तसेच जेएनपीटीचे माजी कामगार विश्वस्त भूषण पाटील, जेएनपीटी कामगार विश्वस्त दिनेश पाटील आणि रवी पाटील यांनाही निवेदन देण्यात आले आहे. याशिवाय पालक संघटना, शिक्षक संघटना, समाजसेवक आणि कामगार नेत्यांना ही त्यांनी साकडे घातले आहे.

जेएनपीए प्रशासकीय अधिकाऱ्यांना ही निवेदने पाठवण्यात आली आहेत. जेणेकरून या प्रश्नावर त्वरित तोडगा काढला जावा, कर्मचाऱ्यांनी आता न्यायासाठी थेट उपोषणाचा मार्ग अवलंबला असून त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

त्यांनी केलेल्या मागण्यामध्ये जुलै २०१९ पासूनची वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ता फरकासह त्वरित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे तसेच जून २०१९ चा भविष्य निर्वाह निधी तात्काळ भरणे आणि गेल्या १०-१२ वर्षांपासून कमी पगारावर काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करून त्यांना शासकीय नियमांनुसार वेतन आणि नियुक्तीपत्र देणे. या प्रमुख मागण्यासह मे २०१९ पासून मराठी माध्यमासाठी इयत्ता आठवी ते दहावीच्या वर्गांना राज्य शासनाकडून आलेले १०० टक्के अनुदान स्वीकारणे व जेएनपीए प्रशासनाकडून दिली जाणारी झअझ फी सवलतीची उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत वाढवणे आणि पात्र कर्मचाऱ्यांना १२ वर्षांची वरिष्ठ वेतन श्रेणी व २४ वर्षांची निवड वेतनश्रेणीचा लाभ तात्काळ मंजूर करणे. तसेच १ जानेवारी २०१६ पासून सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करून थकीत रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करणे आणी सहाव्या वेतन आयोगाची ५१ महिन्यांची आणि पाचव्या वेतन आयोगाची ६३ महिन्यांची थकीत रक्कम त्वरित अदा करणे व ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याबाबतची १७ महिन्यांची थकीत रक्कम जमा करणे. अशा या मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण चालूच राहणार असल्याचा ठाम निर्णय सर्व कर्मचाऱ्यांनी घेतला आहे.

# ...तर निवडणुकीतील घोटाळे उघड होतील

## राहुल गांधींनंतर बाळासाहेब थोरातांचा निवडणूक आयोगावर गंभीर आरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर जोरदार टीका करत लोकसभा निवडणुकीत मतचोरी आणि मोठ्या प्रमाणात घोटाळे झाले आहेत. असा दावा करत, जर निवडणूक आयोगाने डिजिटल स्वरूपात माहिती दिली, तर सर्व घोटाळे समोर येतील, असा गंभीर आरोप माजी मंत्री आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केला आहे. जागतिक आदिवासी दिनानिमित्त नाशिकमध्ये आयोजित कार्यक्रमादरम्यान



पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हे मत व्यक्त केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषदेत सादर केलेल्या मतचोरीच्या पुराव्यांचा उल्लेख करत ते म्हणाले की, निवडणुका चुकीच्या पद्धतीने आणि घोटाळे करून जिंकल्या जात आहेत. भाजप लोकशाही संपवण्याचे काम करत आहे. जनतेने आता जागृत होण्याची गरज आहे. अलीकडच्या निवडणुकांवर संशय व्यक्त करत, राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोग देऊ शकत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. स्वत:च्या पराभवाबाबतही थोरात यांनी आश्चर्य व्यक्त केले. माझ्या पराभवाने सर्वांनाच धक्का बसला आहे. खोटे मतदान नोंदवले गेल्याचा आक्षेप मी घेतला होता, पण त्याचा तपासच झाला नाही, असेही थोरात म्हणाले. तसेच निवडणूक आयोगाने ४५ दिवसांत सर्व पुरावे नष्ट करण्याचा निर्णय कसा घेतला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दरम्यान थोरात यांच्या या आरोपांमुळे सत्ताधारी आणि विरोधकांमधील वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी जनतेला लोकशाही रक्षणासाठी जागृत होण्याचे आवाहनही केले आहे.

# डॉ. प्रवीण गेडाम यांचा सपत्नीक सत्कार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** दिनांक ०९ ऑगस्ट २०२५ रोजी प्रगती सांस्कृतिक सभागृह दिघोरी नागपूर येथे आनंद बहुउद्देशीय मागास महिला मंडळ परसोडी उमरेड यांच्यावतीने रामकृष्णा गेडाम (सेवा निवृत गट शिक्षणाधिकारी) यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी लिहीलेल्या पाऊलखुणा या पुस्तकाचे प्रकाशन, मान्यवरांचा सत्कार, सन्मान आणि कृतज्ञता सोहळया निमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षणशास्त्र विषयात पी.एच.डी प्राप्त केल्याबद्दल सपत्नीक सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज.मो.अभ्यंकर, से.नि.महाराष्ट्र



राज्य प्रकल्प संचालक, माजी अध्यक्ष अल्पसंख्यांक आयोग म.रा.मुंबई (मंत्री दर्जा), विद्यमान आमदार, (विधानपरिषद सदस्य) मुंबई. विशेष अतिथी संजयजी मेशाम आमदार, उमरेड ई. झेड. खोब्रागडे (भा.प्र.से.) से.नि. सनदी अधिकारी, नागपूर. प्रमुख पाहुणे चंद्रमणी बोरकर, से.नि. शिक्षण संचालक म.रा. पुणे, एन.ए.ठमके,

शालिकरामकुकडे, से.नि. शिक्षणाधिकारी, प्रभाकर ताडेकर प्रदत थोर साहित्यिक, शिक्षण क्षेत्रातली मान्यवर मंडळी व आप्तस्वकीय यांची उपस्थिती होती.

# थोडक्यात

## विरांगणा राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण उपक्रमाचे चंद्रपूरमध्ये लोकार्पण

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०९, चंद्रपूर :** आदिवासी महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन व सामाजिक सक्षमता देऊन सर्वांगिण सक्षम बनविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना उपक्रमाचा जिल्हास्तरीय लोकार्पण सोहळा आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे पार पडला. राज्यातील मुख्य लोकार्पण समारंभ नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्याचे थेट प्रक्षेपण चंद्रपूर कार्यक्रमात दाखविण्यात आले.

जिल्हा कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आ. किशोर जोरगेवार, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आदिवासी महिलांनी मान्यवरांना राखी बांधून योजनेचे स्वागत केले. विविध शासकीय योजनांचे लाभ प्रदान करून 'राखी पौर्णिमा' साजरी करण्यात आली. हंसराज अहिर यांनी महिलांना केवळ शिक्षण नव्हे तर आर्थिक सक्षमता देणे आवश्यक असल्याचे सांगितले. आ. जोरगेवार यांनी आदिवासी युवतींना जास्तीत जास्त योजनांचा लाभ मिळावा. यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी महिलांनी या उपक्रमाचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे सांगून राज्य शासन या योजनेच्या उद्देशपूर्तीसाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## खोडाळ्यात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : सौरभ कामडी**



**दि.०९, मोखाडा (पालघर) :** ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन संपूर्ण जगात मोठ्या जल्लोषात साजरा होतो. आदिवासी बांधवांची जीवनशैली व त्यांची ओळख दर्शवणारा पारंपरिक पेहराव वेशभूषा संस्कृतीचा वेगळेपणा जपणारा उत्सव तसेच निसर्गावर अतुल्य प्रेम जल जंगल जमिनीवरील निष्ठा मानवतेवरील प्रेम श्रद्धा निष्ठेने हा उत्सव साजरा होतो याच निष्ठेने खोडाळा येथे मोठ्या जल्लोषात हा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात हजारो आदिवासी बांधवांनी एकजुटीचे दर्शन दाखवले. यावेळी खोडाळा बाजारपेठेतून रॅली काढण्यात आली डीजे संबळ तुतारी तारपा वाद्यावर पारंपारिक नृत्य करत संबंध परिसरात जय आदिवासी जय जोहार घोषणांचा जय जय कार ऐकावयास मिळाला. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात लावण्यात आलेल्या वीर आदिवासी क्रांतिकारांच्या फोटोस आलेल्या मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करत पूजन करण्यात आले याप्रसंगी आमदार हरिश्चंद्र भोये, माजी आमदार सुनील भुसारा, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हा परिषद सदस्य कुसुमताई झोले, जिल्हा परिषद सदस्य हबीब भाई शेख, मोखाडा शहराचे नगराध्यक्ष अमोल पाटील, अशोक पाटील अनेक लोकप्रतिनिधी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे क्रांती करांचे विचार आदर्श व्यक्तींचा सन्मान नवनियुक्त कर्मचारी सेवामुक्त कर्मचारी यांच्या सन्मानाचा कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयातील हॉलमध्ये घेण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी क्रांतिकरांच्या बलिदानाचे मोल आपल्या विचाराद्वारे उपस्थितांसमोर मांडले यावेळी आयोजक आदिवासी समन्वय समिती सर्व सदस्य आदिवासी बांधव महिला उपस्थित होत्या.

## बौद्ध प्रशिक्षण केंद्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे भूमिपूजन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथे श्रावण पौर्णिमा व वर्षावासाचे औचित्य साधून दि. ९ ऑगस्ट रोजी माजी नगरसेवक मारोती संभाजी चौदंते यांच्या परिवाराच्या वतीने भोजनदान व बोधिवृक्षाचे वर्धापन दिन साजरा करण्यात आला आहे.

१९९० साली भारतीय जनता पक्षाची मुदखेड नगरपालिकेवर एकहाती सत्ता होती त्या काळात माजी नगराध्यक्ष राम चौधरी व माजी नगरसेवक मारोती चौदंते यांच्या प्रयत्नातून बौद्ध समाजाला बौद्ध विहारासाठी जागा उपलब्ध करून दिली होती त्याच काळात माजी नगरसेवक मारोती चौदंते यांच्या वतीने त्या जागेत बोधिवृक्षाचे रोपटं लावण्यात आले होते त्या बोधिवृक्षाला आज जवळपास ३५ वर्ष पुर्ण झाले आहे व श्रावण पौर्णिमा वर्षावास या निमित्ताने त्यांच्या परिवाराच्या वतीने भोजनदान कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

तसेच भंत्ते शिलरत्न थेरो, भंते गगनबोधी, भंते सत्यानंद थेरो (हैदराबाद),भदंत पट्टीसेना (कामठा) आणि भिख्खू संघ यांच्या संकल्पनेतुन बौद्ध प्रशिक्षण केंद्रात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन भिकू संघाच्या उपस्थितीत माजी नगराध्यक्ष राम चौधरी, माजी नगरसेवक मारोती चौदंते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महामाया महिला मंडळ, माजी नगराध्यक्ष राम चौधरी, माजी नगरसेवक मारोती चौदंते, भीमशाहीर आनंद कीर्तने, मधुकर अटकोरे, प्रसेनजित चौदंते, डीजी चौदंते, चंद्रकांत हौसरे, बाळकृष्ण चौदंते,दादाराव चौदंते, सुभाष चौदंते, कुणाल चौदंते, महेंद्र चौदंते,शिवानंद देवके, रावसाहेब चौदंते, अमोल चौदंते, राहुल आप्पा चौदंते, सावते, माजी सैनिक सुनिल चौदंते, बजरंग खोडके, प्रवीण चौदंते, यांसह बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.